महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३५

# महाराजा सयाजीराव : आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य

## शिवानी घोंगडे



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ३५

# महाराजा सयाजीराव : आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य

शिवानी घोंगडे

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव : आरोग्य
आणि व्यायामविषयक कार्य
इतिहास
शिवानी घोंगडे
●
प्रकाशन क्रमांक - ५५
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : शिवानी घोंगडे,
सकटे गल्ली, मोहरे,
ता. पन्हाळा,
जि. कोल्हापूर. ४१६११४
मो. ८०१०४४७७४०
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ३५ रुपये

---

● मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
● या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
● **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
● **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव : आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य

महाराजा सयाजीरावांचे प्रत्येक क्षेत्रातील कार्य आपल्याला चकित करून सोडणारे आहे. एक प्रशासक जनतेचा किती खोल आणि सूक्ष्म पातळीवर विचार करू शकतो याचा उत्तम नमुना सयाजीरावांच्या कार्यप्रणालीतून व्यक्त होतो. म्हणूनच समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रात अगदी मुळापर्यंत जाऊन मूलभूत काम करण्याचा सयाजीरावांचा दृष्टीकोन भारतात सोडा जगाच्या इतिहासात अपवादात्मक ठरेल असा आहे. ज्या-ज्या क्षेत्रात त्यांनी काम केले त्या-त्या क्षेत्रात एखादा कर्तव्यदक्ष कुटुंबप्रमुख ज्याप्रमाणे कुटुंबाच्या सर्व आघाड्यांवर ज्या तळमळीने लक्ष देतो तीच तळमळ सयाजीरावांच्या सर्व कामात दिसते. एखादा राजा आपल्या प्रजेप्रती किती कर्तव्यदक्ष असू शकतो याचा जणू आदर्शच सयाजीरावांनी घालून दिला होता. प्रत्येक क्षेत्रातील कामाप्रमाणे सयाजीरावांनी प्रजेच्या आरोग्य आणि व्यायामाच्या क्षेत्रातही पायाभूत काम केले.

सयाजीराव महाराज हे ‘सर्व क्षेत्रात सर्वोत्तम’ काम करण्याचा ध्यास घेतलेले प्रशासक होते. महाराजांनी ज्या-ज्या क्षेत्रात काम केले त्या-त्या क्षेत्रात जागतिक मानदंड प्रस्थापित केले. आपली प्रजा जागतिक मानदंडात जीवन जगणारी असावी. या भूमिकेतून आरोग्यविषयक जगभरातील सर्वोत्तम सुविधा महाराजांनी बडोद्यात निर्माण केल्या. लहान मुले, स्त्रिया, वृध्द, विविध प्रकारचे विकलांग अशा सर्वांच्या आरोग्यासाठी महाराजांनी कायमस्वरूपी उपाययोजना अवलंबिल्या. फक्त आपली प्रजाच नव्हे तर आपल्या राज्यातील पशुधनाचे आरोग्यही सदृढ राहावे यासाठीसुध्दा पशुवैद्यकीय सुविधांची उत्तम यंत्रणा महाराजांनी निर्माण केली. स्वत:च्या आरोग्याइतकीच आपल्या राज्याच्या आरोग्याची काळजी घेणारा सयाजीरावांच्या तोडीचा प्रशासक आधुनिक भारताच्या इतिहासात दुसरा सापडत नाही यातच ‘सयाजी चिंतना’ची आपली गरज अधोरेखित होते.

## प्रजेचे आरोग्य : राष्ट्रीय कर्तव्य

प्रजेचे आरोग्य आणि व्यायाम संवर्धन याकडे सयाजीराव राष्ट्रीय कर्तव्य म्हणून पाहत होते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे सयाजीरावांनी सार्वजनिक आरोग्याचे संवर्धन योग्य रीतीने होण्यासाठी राबवलेला चतु:सूत्री कार्यक्रम होय.

१. स्वच्छ पाण्याचा पुरवठा करणे, मलापहरणाची व सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था करणे.

२. खाद्यपदार्थ व दूध यांच्या विक्रीवर देखरेख ठेवणे व नियंत्रण करणे.

३. नगररचनेची सुसूत्रे अमलात आणून आरोग्य घातक अशा नव्या इमारती किंवा जागा तयार होऊ न देणे व अशा जुन्या इमारतींची सुधारणा करणे.

४. शाळा व कारखान्यांसंबधी योग्य कायदे करून लोकांची शरीरयष्टी बळकट राहील अशी योजना करणे.

सयाजीरावांनी राबवलेला हा कार्यक्रम म्हणजे त्यांच्या सार्वजनिक आरोग्य संवर्धनाच्या दिशेने केलेली वाटचाल होती.

प्रजेचे आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी सर्वप्रथम स्वच्छ पाण्याची आवश्यकता असते. त्यामुळे सयाजीरावांनी बडोदा संस्थानात अनेक पाणीपुरवठा योजना राबविल्या. २९ मार्च १८९२ ला बडोदा पाणीपुरवठा योजनेचा महाराजांच्या हस्ते उद्घाटन समारंभ पार पडला. या योजनेसाठी आजवा येथे ३ मैल लांबीचे मातीचे धरण बांधण्यासाठी जानेवारी १८८५ ते जून १८९० इतका कालावधी लागला. या तलावातील पाणी ८ वर्षे पुरणारे आहे. या कामावर एकूण ३० लाख रुपये खर्च आला. या योजनेमुळे बडोदा शहरात पहिल्यांदाच गाळलेले व शुद्ध पाणी पिण्यासाठी उपलब्ध झाले. हे काम सुरू असताना येथील कामगारांना वैद्यकीय सेवा देण्याच्या हेतूने आजवा येथे तात्पुरत्या स्वरूपाचा दवाखाना सुरू करण्यात आला. २४ एप्रिल १८९७ ला संखेडा पाणीपुरवठा योजनेचे उद्घाटन झाले आणि या तारखेपासूनच लोकांना पाणीपुरवठा केला जाऊ लागला. या पाणीपुरवठ्यावर १६,९३३ रु. खर्च आला. मार्च १९०७ ला महाराजांच्या सिल्व्हर

ज्युबिली वेळी सयाजीरावांनी संस्थानच्या पाणीपुरवठ्यासाठी ५,५०,००० रु. निधी दिला. आजच्या रुपयाच्या मूल्ल्यात या निधीची रक्कम १४२ कोटी २६ लाख ६६ हजार रुपयांहून अधिक भरते. केवळ पाणीपुरवठ्यासाठी दिलेली ही रक्कम सयाजीरावांमधील प्रजाहितदक्ष राजाची साक्ष देते.

## स्वतंत्र वैद्यकीय खाते

संस्थानातील लोकांना वैद्यकीय सुविधा पुरविण्याच्या हेतूने १८७६ मध्ये वैद्यकीय खाते सुरू करण्यात आले. त्यावर दरबारी वैद्य असणाऱ्या डॉ. कोडी यांची मुख्य वैद्यकीय अधिकारी म्हणून नेमणूक केली. आपल्या प्रजेला वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या ध्यासातून सयाजीरावांनी संस्थानात अनेक रुग्णालयांची स्थापना केली. बडोद्यात १८७७-७८ मध्ये 'सयाजीराव मिलिटरी हॉस्पिटल' सुरू करण्यात आले. १८८१-८२ ला बडोदा शहराच्या मध्यभागी 'जमनाबाई हॉस्पिटल' सुरू केले. या इमारतीवर १,५६,२८० रु. खर्च करण्यात आला. ही बडोदा शहरातील सर्वात मोठी वैद्यकीय संस्था होती. त्यात वार्षिक ४४,००० रुग्णांवर उपचार होत असे. १८८७ ला 'न्यू स्टेट हॉस्पिटल, बडोदा'ची स्थापना केली. या इमारतीवर २,०७,५५१ रु. खर्च झाला. १९०६-०७ साली डफरीन रुग्णालयासाठी एक क्ष-किरण उपकरण मागविले आणि यावर काम करण्यासाठी मि. सुमंत बि. मेहता या अधिकाऱ्याला उपकरणाच्या प्रशिक्षणासाठी डेहराडूनला पाठविले. १८८३-८४ साली बडोदा संस्थानात १२

मोठी रुग्णालये व ३० लहान दवाखाने कार्यरत होते. तर १९३९-४० यावर्षी बडोदा संस्थानात एकूण ११७ वैद्यकीय संस्था कार्यरत होत्या.

## दुर्बल व दुर्लक्षित घटकांचे आरोग्य

महाराजांनी समाजातील दुर्बल आणि दुर्लक्षित घटकांच्या आरोग्यासाठी अनेक प्रयत्न केले. सयाजीरावांनी १८९० मध्ये अंसूया येथे कुष्ठरोग्यांचे रुग्णालय सुरू करून कुष्ठरोग्यांच्या उपचाराचा मार्ग आखला. त्याचबरोबर १९११ ला कृष्ठरोग्यांसंबंधी कायदा करण्यात आला. २८ जून १८९८ ला बडोदा येथे वेड्यांचे रुग्णालय सुरू केले. यावर्षी रुग्णालयात १६ रुग्ण दाखल झाले तर रुग्णालयावर एकूण १,४४२ रुपये खर्च झाला. समाजातील अंध व्यक्तींवर उपचार करण्यासाठी बडोद्यातील 'श्री. सयाजी जनरल हॉस्पिटल'मध्ये स्वतंत्र नेत्र विभागाची सुरुवात महाराजांनी केली. या नेत्र विभागात रुग्णांच्या डोळ्यांवर शस्त्रक्रिया केल्या जात होत्या. सयाजीराव महाराजांच्या बडोदा संस्थानातील आरोग्य व्यवस्थेच्या सार्वत्रिकीकरणाचा हा उत्तम पुरावा आहे.

वैद्यकीय क्षेत्रातील पुस्तकांसाठी १८७९-८० ला वैद्यकीय ग्रंथालयाची स्थापना केली. त्यामुळे वैद्यकीय खात्याच्या कर्मचाऱ्यांना मौल्यवान संदर्भ ग्रंथांची सहज उपलब्धता झाली. ग्रंथालयात ४ वैद्यकीय नियतकालिके व दैनिके होती. १८८८ अखेर या वैद्यकीय ग्रंथालयात १,६६३ संदर्भ ग्रंथ उपलब्ध होते. १९०७ ला वैद्यकीय विभागाच्या कामकाजात सुधारणा

करण्यासाठी मुख्य वैद्यकीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बडोद्यात पहिल्यांदाच सिव्हिल सर्जन्सची परिषद भरविण्यात आली.

१८९१-९२ साली स्वच्छता विभागाची (sanitary department) निर्मिती केली. त्यावर डॉ. कृष्णराव धुरंधर यांची स्वच्छता अधीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली. स्वच्छता अधीक्षक दरवर्षी बडोदा संस्थानातील विविध ठिकाणची पाहणी करून स्वच्छतेसंबंधी सुधारणा करणाऱ्या सूचना व 'स्वच्छता' या विषयावर विविध व्याख्याने देत असत. १९०७ साली 'स्वच्छता' व 'स्वच्छतेची तत्त्वे' या दोन पुस्तिका तयार करून लोकांमध्ये वाटण्यात आल्या. १९०९ साली मुंबई येथे भरलेल्या वैद्यकीय महासभेत सहभागी होण्यासाठी स्वच्छता अधीक्षकाला पाठविण्यात आले.

## वैद्यकीय क्षेत्राला मदत

इतर विषयांच्या बरोबरीने वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांनाही सयाजीरावांनी शिक्षणासाठी विविध ठिकाणी पाठविले. १८८७-८८ मध्ये कॅमा हॉस्पिटलला दोन विद्यार्थिनींना परिचारिका व सुईनीचे शिक्षण घेण्यासाठी पाठविले. १८८८ मध्ये शासकीय खर्चाने चार पशुवैद्यकीय विद्यार्थ्यांना बॉम्बे पशुवैद्यकीय महाविद्यालयात पाठविले. १९१३ मध्ये एका वैद्यकीय पदविधारकाला M.D. डिग्रीचे शिक्षण घेण्यासाठी लंडनला पाठविले. भारतीय भाषेतील बहुधा पहिल्या

दशखंडी व्यायामकोश (५,००० पाने) आणि ‘व्यायाम’ या मराठी, गुजराथी, हिंदी, इंग्रजी अशा चार भाषेतून एकाच वेळी निघणाऱ्या मासिकाचे संपादक दत्तात्रय चिंतामण मुजुमदार यांना सयाजीरावांनी १९१३ मध्ये पाश्चात्य देशांतील लोकांचा व्यायाम व आरोग्य यांचा अभ्यास करण्यासाठी सहा महिने युरोपला पाठविले. तर १९१४-१५ ला सूक्ष्मजंतूशास्त्र व रोगनिदानशास्त्र यांचा अभ्यास करण्यासाठी डॉ. पी. एम. नानावटी यांना मोहवाला येथे पाठविले.

## साथ रोग नियंत्रण

१८८४ मध्ये बडोद्यात पटकीची साथी आली. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय योजना राबविण्यात आल्या, त्यामध्ये नवसारी प्रांतात फिरता दवाखाना सुरू केला, तर बडोदा शहरात ८ वैद्यकीय केंद्रे उघडली. एप्रिल मध्ये १९०० दुष्काळी छावणीत पटकीची साथ आली आणि राज्याच्या संपूर्ण भागात पसरली या पटकीग्रस्तांची संख्या १९,८७७ झाली. यावर उपाय म्हणून दररोज पोटॅशियम परमॅगनेटने पिण्याच्या पाण्याचे शुद्धीकरण केले जाऊ लागले. त्याचबरोबर कारागृहातील कैदी व गरीब लोकांना दररोज रोगप्रतिबंधात्मक गोळ्या मोफत दिल्या जाऊ लागल्या.

बडोदा संस्थानात १८९६-९७ ला प्लेगची साथ आली होती. प्लेगचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संस्थानात अनेक उपाययोजना राबविण्यात आल्या. याचवर्षी यात्रेकरूंसाठी आणि प्लेग

संक्रमित ठिकाणाहून आलेल्या लोकांपासून प्लेगचे संक्रमण रोखण्यासाठी ३ तात्पुरत्या स्वरूपाचे दवाखाने सुरू केले. प्लेग झालेल्या रुग्णांच्या राहण्याच्या सोयीसाठी व त्यांच्या उपचारासाठी तीन प्लेग रुग्णालये सुरू केली. तर प्लेगग्रस्त रुग्णांना ठेवण्यासाठी विविध ठिकाणी तात्पुरत्या स्वरूपाच्या १९ प्लेग शेड बांधण्यात आल्या.

फेब्रुवारी १८९८ ला बडोदा शहरात तीन आरोग्य शिबिरांचे आयोजन केले होते. रोगप्रतिबंधक लसीकरणाला उत्तेजन देण्यासाठी बडोदा सरकारने नियमित लसीकरणाची सोय केली. राज्यात याप्रकारे ६,५५१ व्यक्तींचे लसीकरण केले. संसर्गग्रस्तांना शोधणे, गावाबाहेर बांधलेल्या शेडमध्ये ठेवणे (त्यांचे विलगीकरण करणे), तेथे त्यांच्यावर उपचार करणे, त्यांचा इतरांशी संपर्क तोडणे, संक्रमित घरांचे शुद्धीकरण करणे, स्वच्छता व वायुविजन (ventilation) करणे. पहिल्यांदा संक्रमित व्यक्तीला दहा दिवस वेगळे ठेवणे (quarantine) नंतर वीस दिवस ठेवणे या उपाययोजना करण्यात आल्या. १८९९ मध्ये प्लेगसाठी ३२ प्लेग रुग्णालये तात्पुरती सुरू करण्यात आली. १९०० मध्ये मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. शमसुद्दीन सुलेमानी यांनी प्लेगवर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून विशिष्ट प्रकारच्या औषधी गोळ्या बनविल्या व त्या लोकांना मोफत वाटल्या. १९०८ मध्ये प्लेगच्या रोगप्रतिबंधक लसीचे प्रशिक्षण घेण्यासाठी ४ वैद्यकीय अधिकाऱ्यांना मुंबईला पाठविले.

## आरोग्य प्रबोधन

डॉ. बालाभाई यांनी नियुक्त केलेल्या कमिटीद्वारे रुग्णवाहिका, नर्सिंग व घरगुती आरोग्यशास्त्राचे वर्ग आणि परीक्षा यांचे नियम निश्चित केले जात. या कमिटीने केलेले नियम बडोदा सरकारकडून मान्यताप्राप्त असत. १९०१ पासून बडोदा जिल्ह्यात आणि बडोदा शहरात रुग्णवाहिकेवर व्याख्यान व रुग्णालयाच्या संदर्भात मिलिटरी व पोलिसांचे नियमित वर्ग सुरू केले. १९०६ ला 'कौंटेस ऑफ डफरीन' रुग्णालयात दोन रुग्णवाहिका वर्ग होते. या वर्गाची उपस्थिती ११५ होती तर ५६ उमेदवार या रुग्णवाहिकेच्या परीक्षेसाठी बसले होते त्यापैकी ४१ पास झाले. बडोदा येथे घरगुती आरोग्यशास्त्राचा नियमित वर्ग होता. 'कौंटेस ऑफ डफरीन' हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गिमी या वर्गात व्याख्यान देत असत. बडोदा, पाटण, नवसारी आणि अमरेली ही ठिकाणे या विषयाच्या परीक्षेची केंद्रे होती. १९११-१२ साली 'पाण्याचा वापर व गैरवापर', 'हवा आणि प्रकाश', 'डास आणि मलेरिया' या विषयांच्या बरोबरीने घरगुती आरोग्यशास्त्रावरील १० व्याख्याने देण्यात आली. १९१३ साली डॉ. कुपर यांनी पेटलाड येथे 'आरोग्याचे नियम', नवसारी येथे 'मानवी सामर्थ्य', मेहसाणा या ठिकाणी 'आरोग्य आणि त्याचे महत्त्व' आणि बडोदा येथे 'मलेरिया' या विषयांवर व्याख्याने दिली.

## संगीत उपचार

सयाजीराव महाराजांना पहिल्या राणी चिमणाबाईंच्या मृत्यूनंतर निद्रानाशाचा आजार जडला. त्यावर अनेक उपाय करूनही फारसा उपयोग झाला नाही. परंतु कोल्हापूरच्या लक्ष्मीबाई जाधव यांचे गाणे ऐकून महाराजांना चांगली झोप लागू लागली. लक्ष्मीबाईंच्या या कामगिरीमुळे दुसऱ्याच दिवशी त्यांची बडोदा दरबारी गायिका म्हणून नेमणूक करण्यात आली. रुग्णांना दवाखान्यात संगीत ऐकवले तर त्यांच्या तब्येतीत लवकर सुधारणा होऊ शकेल या गृहीतकानुसार बडोद्याच्या हॉस्पिटलमध्ये फय्याज खाँ यांना गायन करण्याचे आदेश महाराजांनी दिले. संगीताचा रुग्णाच्या आरोग्याशी संबंध जोडून महाराजांनी एक अभिनव प्रयोग केला.

## आरोग्यदायी कायदे

स्त्रियांच्या आरोग्यासाठी अत्यंत हानिकारक आणि त्यांच्या प्रगतीतील सर्वात मोठा अडथळा असलेली बालविवाहाची प्रथा मोडीत काढण्यासाठी सयाजीरावांनी १९०४ मध्ये ‘बालविवाह प्रतिबंधक कायदा’ केला. बाळाच्या जन्मावेळी दाई हजर असण्याचे महत्त्व लोकांना पटवून देणे आणि दाईप्रती असणारा निष्काळजीपणा व केले जाणारे दुर्लक्ष यावर मात करण्यासाठी १६ ऑक्टोबर १९१९ रोजी बडोद्यात ‘दाई कायदा’ लागू करण्यात आला. १९३२ मध्ये सयाजीरावांनी बडोद्यात ‘माता कल्याण कायदा’ अमलात आणला. १९२९ ला मुंबई प्रांतात

लागू करण्यात आलेल्या 'बॉम्बे माता कल्याण कायद्या'च्या धर्तीवर हा कायदा करण्यात आला होता. कारखान्यात काम करणाऱ्या महिलांच्या प्रसूतीच्या काही काळ आधी व काही काळ नंतर कारखान्यातील त्यांच्या रोजगाराच्या नियमनाची आणि प्रसूतीदरम्यान त्यांना आर्थिक साहाय्य देण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली. तसेच राज्यातील प्रशिक्षित स्त्रीरोगतज्ज्ञांना रोजगार देण्यासाठी बडोदा सरकारने नियम केला. त्यानुसार स्त्रीरोग तज्ज्ञांचा अर्धा खर्च सरकार व अर्धा खर्च स्थानिक संस्थांनी देण्याची तरतूद केली.

## बालकांचे आरोग्य

बालकांच्या आरोग्याकडेही बडोद्यात विशेष लक्ष दिले जात होते. शाळकरी मुलांच्या नियमित वैद्यकीय तपासणी केल्या जात होत्या. गरीब विद्यार्थ्यांना दूध, औषधे व आवश्यक असल्यास चष्मा पुरवण्याची व्यवस्था सयाजीरावांनी केली होती. तसेच बडोदा शहरात विविध ठिकाणी मातृत्व व बालकल्याण यासंबंधी Magic Lantern (चित्रफित प्रक्षेपण यंत्र) च्या मदतीने ४० व्याख्याने दिली होती. बालकांना वयाच्या आठव्या वर्षी पूर्ण लसीकरण सक्तीचे केले. प्राथमिक लसीकरणाचे वय कमी करून बारा वरून सहा महिने केले. ही तरतूद विशेषतः बडोदा शहरासाठी केली होती. १९१० मध्ये सयाजीरावांनी संस्थानातील मुलामुलींमधील जीवनसत्वांचे प्रमाण जाणून घेऊन त्यांच्यातील दुर्बलता कमी करण्यासाठी सत्त्वविचारक समिती

नेमली. यासंबंधीचे शास्त्रीय शिक्षण देण्याकरिता युरोपमधून या विषयातील तज्ज्ञ आणण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. परंतु यादरम्यान युरोपात पहिल्या महायुद्धाची परिस्थिती निर्माण झाल्याने असा तज्ज्ञ बोलावणे शक्य झाले नाही.

## आरोग्य अहवालाचा आग्रह

सयाजीरावांची नात इंदुमतीदेवी आणि शाहू महाराजांचे पुत्र राजाराम महाराज यांच्या विवाहावेळी सयाजीरावांनी शाहू महाराजांकडे राजारामांच्या आरोग्य अहवालाची मागणी २४ मार्च १९११ रोजीच्या पत्राद्वारे केली होती. आजच्या विज्ञानवादी युगातही लोक विवाह जुळवताना वधू-वरांची जन्मपत्रिका आणि गुण जुळवण्याच्या पलीकडे आरोग्य अहवालाचा अट्टाहास धरताना दिसत नाहीत. परंतु ११० वर्षांपूर्वीचा सयाजीरावांचा हा वैज्ञानिक दृष्टिकोन आजच्या आधुनिक युगातही प्रगतशील ठरतो.

## महाराजांचा व्यायाम

महाराज जनतेच्या आरोग्याबरोबर स्वतःच्या आरोग्याबाबतही अतिशय जागरूक होते. महाराजांच्या दिनक्रमामध्ये प्रशासकीय कामांबरोबर व्यायाम आणि विविध खेळांचा समावेश होता. महाराज पहाटे मल्लखांबाचा सराव करत तर कधी दंड बैठका करून ते घोडे सवारी करत असत. महाराज सर्व सवंगड्यांबरोबर विविध खेळदेखील खेळत. यात मुख्यतः आट्यापाट्या, खोखो,

लिंगोरच्या सूर इ. देशी खेळ महाराजांचे आवडते खेळ होते. याशिवाय अधून-मधून ते बॅडमिंटन वगैरे खेळदेखील खेळत असे. खेळण्याच्या या विशेष आवडीमुळे सयाजीरावांनी अभ्यासाकडे कधीही दुर्लक्ष केले नाही. शिकारीची तर महाराजांना विशेष आवड होती. त्यांनी स्वत: ११ वाघ, अनेक डुक्कर मारले आहेत. महाराज उत्तम नेमबाज म्हणून प्रसिद्ध होते.

सयाजीरावांना कुस्तीदेखील विशेष आवडत होती. पहिलवान जमाल व समद् हे महाराजांना कुस्ती शिकविण्याचे काम करीत व पहिलवान दुधिया हे महाराजांची जोडीदार म्हणून प्रत्यक्ष कुस्ती करत. उत्तम कुस्तीसाठी अंग लवचिक होऊन अंगी चपळता यावी यासाठी हरका जेठी यांच्याकडून महाराज मल्लखांब शिकले. 'शरीरमाध्य खलु धर्मसाधनम' हे तत्त्व महाराजांनी स्वत:च्या आचरणाने तंतोतंत पाळले. महाराणी चिमणाबाई यांना महाराजांच्या सहवासाने व्यायामाची गोडी लागली. त्या सकाळी एक तास व्यायाम करत. तासभर फिरायला जात आणि संध्याकाळी टेनिस खेळत. त्यांच्याबरोबरची सर्व मंडळी त्यांच्यासोबत खेळून थकून जात असे.

## शारीरिक शिक्षण

उत्तम आरोग्याचा मार्ग म्हणून सयाजीराव शारीरिक शिक्षणाकडे पाहत होते. शारीरिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी १८८७ पासून हायस्कूल स्तरावरील विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण

शिष्यवृत्ती महाराजांनी सुरू केली. अशा प्रकारची शिष्यवृत्ती सुरू करणारे बडोदा हे भारतातील पहिले संस्थान होते. अगदी स्वातंत्र्यानंतरही खास शारीरिक शिक्षणासाठी हायस्कूल स्तरावर शिष्यवृत्तीची योजना केंद्र सरकारबरोबर कोणत्याही राज्य सरकारने राबवल्याचे उदाहरण आढळत नाही. १८९५-९६ मध्ये प्रथमच जनतेच्या वर्गणीतून मर्दानी खेळांचे सार्वजनिक प्रदर्शन भरवण्यात आले. महाराजांनी या प्रदर्शनासाठी शंभर रुपये देणगी दिली. शारीरिक प्रशिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने महाराजांनी या प्रदर्शनामध्ये काही बक्षिसे मंजूर केली होती.

१८९८ ला बडोद्यातील शाळांमध्ये चौथीच्या विद्यार्थांना शारीरिक शिक्षण सक्तीचे केले. १९११-१२ मध्ये सरकारच्या वतीने संस्थानातील सर्व प्राथमिक शाळा, पहिल्या श्रेणीच्या अँग्लो व्हर्नक्युलर शाळा आणि हायस्कूलमध्ये क्रीडा शिक्षकांची नियुक्ती करून आवश्यक क्रीडा साहित्य पुरवण्यात आले. नियुक्त केलेल्या या शिक्षकांकडून मल्लखांब, जोडी कुस्ती, कवायत, लांब उडी, उंच उडी, घोडसवारी, सिंगलबार, डबलबार, डंबेल्स इ. क्रीडाप्रकार विद्यार्थ्यांना शिकविले जात. १९३८-३९ मध्ये बडोदा शहर आणि बडोदा महाल क्षेत्रातील सर्व शाळांमध्ये शारीरिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले. संस्थानातील सर्व शाळांमध्ये शारीरिक शिक्षण सक्तीचे करण्यासाठी पुरेशा प्रमाणात शारीरिक शिक्षक तयार करणे आवश्यक होते. या पार्श्वभूमीवर

शाळांमधील शिक्षकांना शारीरिक शिक्षण देण्यासाठी श्री. ए.व्ही. वैद्य यांची बडोदा प्रांताचे शारीरिक शिक्षण निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली.

१९२० मध्ये महाराजांनी कोणत्याही व्यायामशाळेत व्यायाम शिकविणारा शिक्षक नियमित काम करीत असल्यास त्यांना दरमहा २० रुपये मानधन देण्याचा आदेश दिला. प्रत्येक व्यायामशाळेला व्यायामाच्या उपकरणांच्या खरेदीसाठी निम्मा खर्च देण्यास सुरुवात केली. परंतु ती रक्कम ५० रु. पेक्षा अधिक असू नये अशी अट घालण्यात आली. तर व्यायामशाळेच्या बांधकामासाठी ५०० रु. पेक्षा कमी असणारा निम्मा खर्च मदत म्हणून देण्याचा हुकूम सयाजीरावांनी दिला. त्याचबरोबर पोहण्याचा हौद बांधण्याकरिता ५०० रु. पर्यंत मदत देण्याचा निर्णय सयाजीरावांनी घेतला.

राष्ट्र उभारणीतील महत्त्वाचा घटक असणाऱ्या युवकांना सामर्थ्यशाली बनवण्यासाठी सयाजीरावांनी महाविद्यालयीन विद्यार्थांना शारीरिक शिक्षण सक्तीचे करण्याकडे पाऊले उचलली. १९२५–२६ मध्ये बडोद्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षण व शारीरिक शिक्षण देण्यासाठी सयाजीरावांनी प्रो. टनेर या परदेशी तज्ञांना आमंत्रित केले होते. १९३१ मध्ये बडोदा कॉलेजच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले, तर पुढील वर्गातील विद्यार्थ्यांच्या इच्छेनुसार त्यांना शारीरिक शिक्षण दिले जाई.

ऑक्टोबर १९३१ मध्ये मुंबई विद्यापीठातर्फे पाचगणी येथे तीन आठवड्यांच्या शारीरिक प्रशिक्षण कॅम्पचे आयोजन केले होते. या कॅंपमध्ये बडोदा कॉलेजच्या प्रो. मुखर्जी यांच्यासह २१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. तर एका विद्यार्थ्याचा उत्कृष्ट कामगिरीसाठी पदक देऊन सत्कार करण्यात आला. मद्रास येथे शारीरिक शिक्षणाचे प्रशिक्षण घेतलेल्या एम. एम. उपाध्याय यांची शारीरिक शिक्षक म्हणून नियुक्ती केली. १९३२-३३ मध्ये प्रथम वर्षाबरोबरच मध्यवर्ती कला आणि विज्ञान वर्गांना शारीरिक प्रशिक्षण सक्तीचे करण्यात आले.

महिला व पुरुष प्रशिक्षण कॉलेजमधील विद्यार्थांकडून भावी क्रीडा शिक्षकांची कामगिरी उत्तमरीत्या पार पाडली जावी म्हणून त्यांच्यासाठी शारीरिक शिक्षकांची नेमणूक करण्यात आली. १९२३-२४ मध्ये महिला प्रशिक्षण कॉलेजमधील विद्यार्थिनींना शारीरिक शिक्षणाचे प्रशिक्षण देण्यासाठी शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक मिस. जे. ए. मॅकडोनाल्ड यांच्या देखरेखीखाली प्रशिक्षण घेतलेल्या महिला शिक्षिकेची नेमणूक करण्यात आली होती. तर मद्रासमध्ये प्रशिक्षण घेतलेल्या पदवीधारक शिक्षकांनी पुरुष प्रशिक्षण कॉलेजमधील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले.

## व्यायामशाळा

सयाजीरावांनी शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शारीरिक शिक्षणाबरोबरच संस्थानातील इतर नागरिकांच्या व्यायामासाठी खाजगी आखाड्यांना आर्थिक पाठबळ पुरवून प्रोत्साहन दिले. १९२७-२८ मध्ये संस्थानातील ३५ आखाड्यांना एकूण ५,२१९ रु. चे अनुदान बडोदा सरकारमार्फत देण्यात आले. १९२९-३० ला ५० आखाड्यांना ५,४८८ रुपये अनुदान मंजूर केले होते. १९३०-३१ मध्ये खाजगी आखाड्यांना ८,००० रु. मंजूर केले. १९३१-३२ मध्ये ८,००० रु. अनुदान तर १९३२-३३ ७८ खाजगी आखाड्यांना दरम्यान ८,००० रु.  अनुदान देण्यात आले. यावर्षी या खाजगी आखाड्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तपासणी अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली. पुढे १९३३-३४ मध्ये १०९ खाजगी आखाड्यांना सरकारने ५,५०० रुपये अनुदान दिले. १९२७-२८ आणि १९२९-३० ते १९३३-३४ अशा ६ वर्षांच्या काळात सयाजीरावांनी बडोद्यातील आखाड्यांना ४०,२०७ रु. अनुदान दिले. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम १० कोटी २९ लाख रु.हून अधिक भरते. आपल्या संस्थानातील प्रजेला आरोग्यसंपन्न करण्यासाठी सयाजीरावांइतके 'रचनात्मक' प्रयत्न आधुनिक भारतातील अन्य कोणत्याही राज्यकर्त्याने केलेले आढळत नाहीत.

## स्त्रियांच्या आरोग्यशाळा

स्त्रियांच्या आरोग्याकडे नेहमीच दुर्लक्ष झाल्याचे वास्तव आपण जाणतो. आजही राष्ट्राची अर्धी शक्ती असणाऱ्या या स्त्रियांच्या आरोग्याचा फारसा विचार केला जात नाही. परंतु सयाजीराव मात्र समाजाच्या विकासात पुरुषांच्या बरोबरीने योगदान देणाऱ्या या स्त्रियांच्या आरोग्य संवर्धनासाठी आयुष्यभर प्रयत्नरत राहिले. १८८५ मध्ये सयाजीरावांनी बडोद्यात स्त्रियांसाठी स्वतंत्र व्यायामशाळेची स्थापना केली. स्त्रियांसाठी स्वतंत्र व्यायामशाळा सुरू करणारे बडोदा हे भारतातील पहिले संस्थान ठरावे. पुढे १९१५ मध्ये कन्या आरोग्य मंदिर संस्थेची सुरुवात करण्यात आली. बडोद्यात पुरुष संघाप्रमाणे महिलांचेही खेळाचे संघ बनवण्यात आले. बडोद्यात महिलांना खो-खो, थ्रो बॉल, ॲथलेटिक्स, कबड्डी अशा अनेक खेळांचे प्रशिक्षण दिले जात होते. कन्या आरोग्य मंदिरामध्ये मुलींना लाठी, लेझीम, जोडी आसने, फरिगदका, भाला, हातापायाचे व्यायाम, जंबिया इ. आरोग्यवर्धक खेळ शिकविले जात.

## देशी खेळांना प्रोत्साहन

पाश्चिमात्य खेळांबरोबरच भारतीय खेळांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सयाजीरावांनी ‘हिंद विजय जिमखाना’ या क्रीडा संघटनेची स्थापना केली. हिंदविजय जिमखान्याला भारतीय ऑलिंपिक असोसिएशनने स्वतंत्र मान्यता दिली. हिंद विजय जिमखान्याच्या माध्यमातून बडोद्यात दरवर्षी अखिल

भारतीय मर्दानी खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असे. संस्थानातील खेळाडूंच्या शारीरिक क्षमतांचा पुरेपूर विकास करण्याचा उद्देश या स्पर्धांच्या आयोजनामागे होता. १९२७-२८ मध्ये हिंदविजय जिमखान्याला मर्दानी खेळांच्या स्पर्धेच्या आयोजनासाठी १,००० रु.चे अतिरिक्त अनुदान देण्यात आले. १९२९-३० मध्ये आयोजित करण्यात आलेल्या ११ व्या अखिल भारतीय मर्दानी खेळांच्या स्पर्धेसाठी १,००० रु.अनुदान दिले. भारताच्या विविध भागातून खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते. या स्पर्धेत महिलांची संख्याही उल्लेखनीय होती. यावेळी महिला खेळांच्या बक्षीस वितरण समारंभाचे अध्यक्षस्थान सयाजीरावांच्या पत्नी महाराणी चिमणाबाई यांनी भूषवले.

१९३०-३१ मध्ये हिंदविजय जिमखान्याने आयोजित केलेल्या अखिल भारतीय मर्दानी खेळांच्या स्पर्धेसाठी २,००० रु. अनुदान दिले. १९३२-३३ व १९३३-३४ मध्ये एकूण ४,००० रु.चे अनुदान देण्यात आले. १९२७-२८ व १९२९-३० ते १९३३-३४ अशा ५ वर्षांच्या काळात भारतीय मर्दानी खेळांच्या आयोजनासाठी सयाजीरावांनी एकूण ८,००० रु. चे अनुदान दिले. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम १ कोटी ९६ लाख रु.हून अधिक भरते. भारतीय खेळांच्या उत्कर्षासाठी झटणारा सयाजीरावांसारखा दुसरा प्रशासक आधुनिक भारताच्या इतिहासात क्वचितच आढळेल.

## आरोग्य आणि व्यायामविषयक ग्रंथ निर्मिती

शाळा, महाविद्यालयांतून शारीरिक शिक्षण सक्तीचे करण्याबरोबरच सयाजीरावांनी व्यायाम आणि आरोग्यासंदर्भातील ग्रंथ निर्मिती करून त्याद्वारे आरोग्यदायी प्रबोधनाचा मार्ग अवलंबला. 'श्रीसयाजीसाहित्यमालेत' अनेक व्यायाम, क्रीडा आणि आहारविषयक महत्त्वाचे ग्रंथ प्रकाशित केले. तसेच या ग्रंथमालेमध्ये इंग्रजीतील काही ग्रंथांची मराठी आणि गुजराथी या देशी भाषांमध्ये भाषांतरेदेखील प्रसिद्ध केली. यामध्ये 'Child: its Nature and Nurture' (१९२०), 'Life's Mechanism' (१९२१), 'Health and Diseases' (१९२९), 'Dietetics' (१९२९) या ग्रंथांचे गुजराथी भाषांतर तर यातील Child: its Nature & Nurture (१९३०) चे मराठी भाषांतरसुद्धा प्रकाशित केले. तसेच मल्लविद्या (१९२५), प्राचीन युद्धविद्या (१९३४), मज्जातंतुनुं बळ (१९३४), आहार विज्ञान (१९५४) इ. ग्रंथ प्रकाशित झाले.

व्यायाम या विषयाला वाहिलेले मराठीतील पहिले मासिक १९१५ मध्ये 'व्यायाम' या नावाने आबासाहेब मुजुमदार यांच्या संपादनाखाली सुरू केले. हे मासिक ४३ वर्षे बडोद्यात सुरू होते. हे मासिक मराठी बरोबरच गुजराथी, हिंदी आणि इंग्रजीमध्ये निघत होते. विद्यार्थ्यांसाठी हे मासिक फारच उपयुक्त असल्याने याच्या ५०० प्रती बडोदा संस्थानातील शाळांना घेण्याचा हुकूम सयाजीरावांनी काढला होता. महाराजांकडून मिळालेला हा

पाठिंबा या मासिकासाठी उपकारक ठरला. याच आबासाहेब मुजुमदारांनी १९३६ ते १९४९ या कालावधीत ‘व्यायामकोश’ हा अद्वितीय कोश दहा खंडात प्रसिद्ध केला. हा व्यायामासंदर्भातला मराठीतील आणि बहुधा कोणत्याही भारतीय भाषेतील पहिला कोश आहे. १९३६ मध्ये महाराजांनी या प्रत्येक खंडाच्या १०० प्रती विकत घेण्याच्या बदल्यात एकरकमी ७,००० रु. ची मदत मुजुमदारांना केली.

व्यायाम मासिक असो किंवा व्यायामकोश असो या कामाला फक्त प्रेरणा नव्हे तर भक्कम आर्थिक साहाय्य करून महाराजांनी हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण करण्यामध्ये ऐतिहासिक भूमिका पार पाडली होती. आजही या कोशाच्या जवळपासही जाणारे काम मराठीत झालेले नाही. यातच महाराजांच्या कालातीत कर्तृत्वाचा पुरावा मिळतो. १९३६ चे ७,००० रु. म्हणजे आजच्या रुपयाच्या मूल्यात ११ कोटी ७९ लाख रुपये होत. विशेष म्हणजे महाराजांचे नातू प्रतापसिंह यांनी महाराजांचा हा वारसा जपत १९४८ मध्ये ९ व्या खंडासाठी २,००० रुपये व १९४९ मध्ये १० व्या खंडासाठी २,००० रुपये असे एकूण ४,००० रुपये दिले. म्हणजेच या प्रकल्पाचा पाया महाराजांनी घातला आणि पुढे १३ वर्षांनी महाराजांचे नातू प्रतापसिंह यांनी या प्रकल्पाच्या पूर्णत्वाचा कळस चढविला. हा सुद्धा महाराजांच्या कार्याचाच प्रभाव होता. याच मुजुमदारांनी १९५० मध्ये ७३४ पृष्ठांचा ‘An Encyclopedia of Indian Physical Culture’ हा ग्रंथ तयार केला.

राष्ट्रीय खेळासंबंधीची तसेच जुन्या खेळांसह नव्या पाश्चात्य खेळांची माहिती जनतेला करून देण्यासाठी महाराजांनी क्रीडा ग्रंथमाला सुरू केली. या मालेतून नऊ-दहा पुस्तके प्रसिद्ध करण्यात आली. कालेलकरांनी लिहिलेले व देवधरांनी दुरुस्त करून प्रसिद्ध केलेले 'मराठी खेळाचे पुस्तक' हे अत्यंत महत्त्वाचे पण आज दुर्मिळ असणारे पुस्तक छापण्यासाठी महाराजांनी ४,००० रुपये मदत दिली. जुम्मादादा व्यायाम मंदिराचे संस्थापक राजरत्न प्रो. माणिकराव यांनी 'व्यायाम मंदिर', 'शरीरशास्त्र', 'मालिश', 'संघव्यायाम' हे महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. १,८०० शस्त्रांची सविस्तर माहिती देणारा 'प्रतापशस्त्रागार' हा त्यांचा ग्रंथ आजही अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतो.

याबरोबरच 'पदाति व्यायाम अर्थात पायदळ पलटणीची 'कवायत', 'शस्त्रागार' इ. मराठी आणि गुजराथीतील काही पायाभूत ग्रंथ महाराजांनी तयार करून घेतले. संस्थानच्या शिक्षण विभागातर्फे सचित्र खेळांचे पुस्तक, बालवीरांचे खेळ, खेळांचा अभ्यास, लहान मुलांचे खेळ, आट्या-पाट्या, खो-खो, हुतूतू, मैदानी खेळांचे नियम, विटीदांडू नियम ही पुस्तकेदेखील महाराजांनी प्रकाशित केली. इतकेच नव्हे तर इंग्रजीत असणारे कवायतीचे हुकूम हिंदी आणि मराठीमध्ये भाषांतरित करण्याचे काम सयाजीरावांनी प्रो. माणिकरावांवर सोपविले होते. प्रो. माणिकरावांच्या कार्याचा गौरव म्हणून सयाजीरावांनी १९०६ मध्ये त्यांना 'राजरत्न' पदवी देऊन गौरवले. विशेष म्हणजे

महाराजांच्या आज्ञेनुसार बी. ए. मध्ये शिकणाऱ्या रा. वामनराव चिंतामण तवकर यांनी लिहिलेला 'शारीरिक शिक्षणाचा ऱ्हास व तो थांबविण्याचे उपाय' हा निबंध सयाजीरावांना प्रचंड आवडला. यावेळी महाराजांनी त्यांना ५०० रु. बक्षीस दिले. तर १९२३-२४ मध्ये शारीरिक शिक्षण आणि संस्कृतीवरील २ नियतकालिकांचे प्रकाशन करण्यात आले.

ग्रंथ प्रकाशनाबरोबरच जगभरातील तज्ज्ञ व्यक्तींच्या व्याख्यानांद्वारे जनतेची आरोग्यविषयक साक्षरता वाढवण्यावर सयाजीरावांनी जाणीवपूर्वक भर दिला. जागतिक व्यायामतज्ज्ञ युजेन सँडो यांच्या १९०४ मधील भारत भेटीवेळी महाराजांनी त्यांना बडोद्यास बोलावून त्यांचे बडोदा कॉलेजमध्ये ४५ मिनिटांचे व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानासाठी सयाजीरावांनी सँडो यांना ४,५०० रु. मानधन दिले. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम १ कोटी २५ लाख रु.हून अधिक भरते.

## भारताच्या क्रीडा क्षेत्राला योगदान

सयाजीरावांनी आपल्या कारकीर्दीत केलेल्या या रचनात्मक प्रयत्नांची फळे स्वतंत्र भारताला चाखायला मिळाली. भारतीय क्रिकेट संघाचे माजी यष्टीरक्षक किरण मोरे व आघाडीचे फलंदाज बडोद्याच्या राजघराण्यातील अंशुमन गायकवाड यांसारखे खेळाडू बडोदा भूमीत घडले. क्रिकेटमधून भालाफेकीकडे वळलेल्या रजिया शेखने सुरुवातीला बडोदे, गुजरात, भारत

व नंतर आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेऊन अनेक राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित केले. आशियाई स्पर्धेत भाग घेणारी ती बडोद्याची व गुजरातची पहिली महिला ठरली.

सयाजीरावांच्या पश्चात बडोद्यातील 'थोरातांचा आखाडा' या नामांकित व्यायाम शाळेने शंकरराव थोरातांच्या मार्गदर्शनाखाली संभाजी गायकवाड, शाहू गायकवाड यांच्यासारखे नामवंत कुस्तीगीर तयार केले. सलाटवाडा व्यायामशाळेने वसंत सुर्वे, कल्याण घाग, लक्ष्मण वाडकर यासारखे सुप्रसिद्ध खेळाडू तयार केले. या क्रीडा क्षेत्रात जेतलपूर येथील मुस्लिम व्यायामशाळेने मम्रज खान पठाण व मुन्वर खान पठाण यासारखे मुंबई राज्य क्रीडा स्पर्धेत ब्राँझपदक मिळवणारे क्रीडापटू दिले.

टेबल टेनिस हा विदेशी खेळ स्वातंत्र्यप्राप्तीनंतर हळूहळू बडोद्यात रुजला. भारतात सिंगल्सप्रमाणे डबल्समधील सामन्यांमध्ये या क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कलिका जयवंत, ललिता गायकवाड, राणी काळे, रोशन झेनोबिया सेठना, मीना दामले या महिला विभागात अग्रेसर होत्या. त्यानंतर प्रसाद विप्रदासने जागतिक स्पर्धेत पंचांचे यशस्वी काम करून बडोद्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्पर्धेत व जागतिक स्पर्धेत गाजविले.

## आरोग्य आणि क्रीडा क्षेत्रास मदत

सयाजीरावांनी आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीत जनतेच्या आरोग्य संवर्धनासाठी भरभरून खर्च केला. १८९२ ला मुंबई येथील महारोगी आश्रमास १०,००० रु. मदत दिली. बडोद्यात स्त्रियांच्या

आरोग्यासाठी उभारलेल्या ‘काउंटेस ऑफ डफरीन फंडा’स १०,००० रु. दिले. १९१३ मध्ये दिल्लीच्या लेडी हार्डिग्ज स्त्री वैद्य विद्यालयास १ लाख रुपयांचे आर्थिक साहाय्य केले. १९१६ ला दिल्लीतील लेडी हार्डिग्ज हॉस्पिटलला स्त्रियांसाठी ६२ हजार रु. दिले. १९२४ मध्ये हिंदी पहेलवान युरोपात पाठविण्याच्या फंडास १,००० रु. दिले. या काही प्रमुख रकमांचा उल्लेख येथे केला आहे. सयाजीरावांनी आरोग्यासाठी खर्च केलेली सर्व रक्कम एकत्रितपणे अंदाजे २५ कोटी ३३ लाख रु. हून अधिक भरते. बलशाली भारत घडवण्याच्या स्वप्नाचा पाठलाग स्वातंत्र्यानंतर गेली ७० वर्षे आपण करत आहोत. परंतु स्वातंत्र्यापूर्वी ७० वर्षे महाराजांनी या क्षेत्रात करून ठेवलेले काम आजही अनुकरणीय आहे.

आज जग कोरोनाच्या महामारीने चिंताक्रांत झाले असतानाच्या पार्श्वभूमीवर सयाजीराव महाराजांची आरोग्य संवर्धक दृष्टी जगातल्या सर्वच प्रशासकांनी मार्गदर्शक म्हणून स्वीकारावी अशी आहे. ‘रोग झाल्यानंतर इलाज करण्यापेक्षा रोग होऊ नये म्हणून उपाययोजना करणे हे आरोग्यसूत्र सयाजीरावांनी आपल्या प्रशासनाचे धोरण म्हणून स्वीकारले होते’. स्वच्छता, शुद्ध पाणी, पौष्टिक आहार आणि व्यायाम या चतु:सूत्रीवर महाराजांनी मूलभूत काम करून ठेवले होते. साथीच्या रोगांवरील महाराजांनी केलेली उपाययोजना हीसुद्धा

दक्ष कुटुंबाच्या भूमिकेतून केलेली उपाययोजना होती. मानसिक आणि शारीरिक आरोग्य या दोन्ही एकाच वेळी हाताळण्याच्या बाबी आहेत याचे भानही महाराजांनी जोपासले होते.

वाचन हे मानसिक आरोग्यासाठीचे सर्वात मोठे औषध मानून महाराजांनी ग्रंथालय चळवळ अगदी स्मशानभूमी, पोलिस स्टेशन, जेल आणि दवाखान्यापर्यंत नेली. उपचारापेक्षा आरोग्यदायी सामाजिक पर्यावरणाच्या निर्मितीवर महाराजांनी सातत्याने काम केले. म्हणूनच आरोग्य हा विषय हातळणाऱ्या महाराजांच्या समकालीन आणि त्यानंतर आजअखेरच्या सर्व प्रशासकांशी महाराजांची तुलना केली असता इतर क्षेत्राप्रमाणे आरोग्यविषयक क्षेत्रातसुद्धा 'मानदंड' निर्माण करणारे काम करणारे सयाजीराव हे 'एकमेवाद्वितीय' प्रशासक ठरतात. आज ज्याप्रमाणे 'world happiness index' दरवर्षी प्रकाशित केला जातो, तसा त्या काळात प्रकाशित केला जात असता तर बडोदा हे जगातील ५ आनंदी देशांच्या यादीत अग्रक्रमाने राहिले असते इतके नक्की!

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर - दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव - डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर - सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई - दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील - शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह - देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद - डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा - राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती - निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर - सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा - राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सयाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :



**❐ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Specchess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाची महाराजा सयाजीरावांची वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळयात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाली आहेत.


**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com